# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 25.07.2025** **वार-शुक्रवार**

---

**<u>महात्मा फुले जनआरोग्य</u>**

राज्यातील प्रत्येक नागरिकाला पाच लाख रुपयांपर्यंतचे मोफत उपचार पुरवणाऱ्या राज्य सरकारच्या महात्मा फुले जनआरोग्य योजनेत आणखी सुधारणा होत असून, या योजनेचे सक्षमीकरण करण्यात येत आहे. सध्या या योजनेत 1 हजार 326 प्रकारचे विविध  उपचार, शस्त्रक्रिया, समाविष्ट आहेत. आता त्यामध्ये आणखी तितक्याच नवीन उपचारांचा समावेश होणार आहे. सध्या राज्यात अडीच हजार रुग्णालयांमध्ये ही योजना सुरू आहे; आता ही रुग्णालयांची संख्या साडेचार हजार पर्यंत वाढवण्यात येणार आहे, अशी माहिती राज्य आरोग्य हमी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांनी दिली.

**<u>क्षयरोग</u>**

'क्षयरोगमुक्त भारत' उपक्रमांतर्गत पुणे महापालिकेचा आरोग्य विभाग शहरात क्षयरोग तपासणी शिबिरं घेत आहे. गेल्या महिन्यापासून सुरू झालेल्या या शिबिरांमध्ये आत्तापर्यंत एक लाख 39 हजार नागरिकांची क्षयरोगाची तपासणी करण्यात आली आहे. त्यातून 15 रुग्णांना क्षयरोगाचं निदान झालं; या रुग्णांना औषधोपचार, पोषण आहार आणि आहारासाठीचा भत्ता महापालिका प्रशासनाने सुरू केला आहे. राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमा अंतर्गत केंद्र सरकारनं क्षयरुग्णांसाठी निक्षय पोषण योजना सुरू केली आहे. त्याद्वारे पुणे महापालिकेने 2022 ते जून 2025 पर्यंत 4 हजार 437 क्षयरुग्णांना 17 हजार 669 पोषण पाकिटांचं वाटप केलं आहे.

**<u>डेंग्यू</u>**

पिंपरी-चिंचवड शहरात या महिन्यात डेंग्यूच्या रुग्णांमध्ये वाढ झाली आहे. गेल्या 25 दिवसांत 14 जणांना डेंग्यूची लागण झाली असून, रुग्णसंख्या 16 झाली आहे. तर, मलेरियाचे 21 रुग्ण आढळले आहेत. डेंग्यू, मलेरियासारखे कीटकजन्य आजार रोखण्यासाठी पाच लाखांपेक्षा जास्त घरांची तपासणी करण्यात आल्याचं महापालिका आरोग्य विभागाने सांगितलं. कीटकजन्य आणि जलजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेने उपाययोजना सुरू केल्या आहेत; आता पर्यंत पाच लाखांहून घरं, तसंच कंटेनर, भंगार मालाची दुकानं, बांधकाम स्थळ अशा विविध ठिकाणांची तपासणी करण्यात आली आहे.

**<u>पुणे मनपा</u>**

पुणे महापालिकेकडे मिळकतकर भरण्यासाठी नागरिकांनी जमा केलेले सुमारे 1 हजार 530 धनादेश वटले नाहीत. कोट्यवधी रुपयांचे धनादेश न वटल्याने महापालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागाने संबंधित मिळकतदारांना नोटीसा पाठवल्या असल्याचं महापालिकेचे उपायुक्त आणि कर संकलन विभागाचे प्रमुख अविनाश संकपाळ यांनी आज

पत्रकारांना सांगितलं. नोटीसा पाठवल्यानंतर 882 मिळकतदारांनी दंडासह मिळकतकर भरला आहे. मात्र, अजूनही 640 जणांनी कर भरलेला नाही, असं संकपाळ यांनी सांगितलं.

**<u>थकबाकी</u>**

पिंपरी चिंचवडमधील थकबाकीदार मालमत्ताधारकांवर कारवाई केली जाणार आहे. महापालिकेने पहिल्या तिमाहीत 522 कोटी रुपयांचा कर वसूल केला आहे. एकंदर 7 लाख 31 हजार मिळकतींपैकी आतापर्यंत 4 लाख 26 हजार मालमत्ताधारकांनी मालमत्ता कराचा भरणा केला आहे. 34 हजार 22 मालमत्ता धारकांनी आतापर्यंत एकदाही मालमत्ता कर भरलेला नाही; अशा मालमत्ताधारकांवर कठोर कारवाई करणार असल्याचं कर संकलन विभागाचे सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांनी सांगितलं.

**<u>वाहतूक कोंडी</u>**

पुण्यातील कोथरूड भागातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी आवश्यक्तेनुसार सीसीटीव्ही आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित चलनांची संख्या वाढवा, अशी सूचना उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली आहे; या संदर्भात नुकत्याच झालेल्या बैठकीत ते बोलत होते.

**<u>बालवाडी</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेने विशेष मोहीम हाती घेत महापालिकेच्या सर्व 211 बालवाड्यांमध्ये महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. 16 तज्ज्ञ प्रशिक्षक आणि 9 पर्यवेक्षक सर्व बालवाड्यांमध्ये या मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी कार्यरत आहेत.

**<u>छावा संघटना</u>**

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी छावा संघटनेचे अध्यक्ष विजय घाडगे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे. घाडगे यांनी आज पुण्यात अजित पवार यांची भेट घेतली, त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. कोकाटे यांनी दोन दिवसात राजीनामा दिला नाही, तर छावा संघटना राज्यभर आंदोलन करेल, असा इशाराही घाडगे यांनी दिला आहे.

**<u>निवड</u>**

दी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी पुण्यातील नामवंत सीएमए नीरज जोशी यांची निवड झाली आहे. ही निवड 2025-26 या कालावधीसाठी करण्यात आली आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज दिवसभर पावसाच्या हलक्या सरी पडत आहेत. उद्याही शहरात मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असून घाट परिसरात मुसळधार पावसाचा इशारा पुणे वेधशाळेनं दिला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**